<u>आदेश</u>

जा.क्र.पोआ/११(६)/सार्वत्रिक निवडणूक –२०२४

**पोलीस उप आयुक्त (अभियान) बृहन्मुंबई तथा कार्यकारी दंडाधिकारी**

**विषय:– भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम १६३ नुसार आदेश.**

ज्याअर्थी, मा. भारत निवडणूक आयोजन विधानसभा सार्वत्रिक निवडणूक–२०२४ साठी कार्यक्रम दिनांक १५/१०/२०२४ रोजी घोषित केला आहे. निवडणूक कार्यक्रम घोषित केल्याच्या दिनांकापासून आदर्श आचार संहिता अंमलात आलेली आहे. त्यामुळे मुंबई शहर जिल्हयात विधानसभा निवडणूकीची संपूर्ण प्रक्रिया शांततेत, निर्भय व न्याय वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीकोनातून निवडणूक कालावधीत निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात उमेदवारांनी नामनिर्देशनपत्र दाखल करतेवेळेस निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात वाहनाच्या ताफ्यामध्ये **तीन पेक्षा जास्त मोटार गाडया/वाहने यांचा समावेश नसावा**. तसेच नामनिर्देशनपत्र दाखल करते वेळेस **निवडणूक अधिकारी यांचे दालनात पाच व्यक्ती उपस्थित राहतील** या व्यतिरिक्त कोणालाही निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या दालनात प्रवेश दिला जाणार नाही. निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात नामनिर्देशनपत्र दाखल करतेवेळेस कार्यालयाच्या **परिसरात मिरवणूक/सभा घेणे, कोणत्याही प्रकारच्या घोषणा देणे/वाद्य वाजविणे किंवा गाणी म्हणणे आणि कोणत्याही प्रकारचा निवडणूक प्रचार करणेस प्रतिबंध घालणे आवश्यक असल्याची माझी खात्री झाली आहे.** आणि ज्याअर्थी, सर्व संबंधितांना नोटीस देवून त्यांचे म्हणणे ऐकुण घेणे सद्यस्थितीत शक्य नसल्याने भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम १६३ (२) नुसार एकतर्फी आदेश काढणे आवश्यक असल्याची माझी खात्री झाली आहे.

त्याअर्थी, **मी अकबर पठाण, पोलीस उप आयुक्त (अभियान), बृहन्मुंबई** मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई शहर यांचेवतीने भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम १६३ अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करून असे आदेश देत आहे की,

१. निवडणूकीचे कालावधीत मुंबई शहर जिल्हयात विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणूक कालावधीत निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात उमेदवारांनी नामनिर्देशनपत्र दाखल करते वेळेस वाहनांच्या ताफ्यामध्ये **तीन पेक्षा जास्त मोटार गाडया/वाहने** निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयाचे १०० मिटर परिसरात नेणार नाहीत.

२. तसेच निवडणूक निर्णय अधिकारी यांचे दालनात **पाच व्यक्ती व्यतिरीक्त कोणालाही प्रवेश दिला जाणार नाही.**

३. एकाच वेळी विविध पक्षाचे दोन किंवा अधिक उमेदवार/कार्यकर्ते अर्ज भरण्याच्या प्रक्रियेस आल्यास एकमेकांविरोधात चिथावणी देणारे कोणतेही कृत्य करणार नाहीत.

४. तसेच निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात नामनिर्देशनपत्र दाखल करते वेळेस कार्यालयाच्या परिसरात मिरवणूक/सभा घेणे, कोणत्याही प्रकारच्या घोषणा देणे/वाद्य वाजविणे किंवा गाणी म्हणणे आणि कोणत्याही प्रकारचा निवडणूक प्रचार करणेस प्रतिबंध करण्यात येत आहे.

सदरील आदेश हे आदेश दिनांक २२ ऑक्टोबर, २०२४ चे ०८:०० वाजता पासून दिनांक ०४ नोव्हेंबर २०२४ चे २४:०० वाजता पर्यंत संपुर्ण मुंबई शहर जिल्हयात अंमलात राहतील.

सदरील आदेश आज दिनांक 21 ऑक्टोबर, २०२४ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी निर्गमित करण्यात येते.

Deputy Commissioner of Police (Operations) Brihan Mumbai

दिनांक 21 / 10 /२०२४

( अकबर पठाण )
पोलीस उप आयुक्त, (अभियान),
तथा कार्यकारी दंडाधिकारी
बृहन्मुंबई

Scanned with CamScanner